# ई-विविधा

अंक : ०२ मे २०२६



**कार्यकारी संपादक**
मंदार कुळकर्णी

**मुद्रितशोधन**
तेजाली शहासने

**संपादक मंडळ**
वैभवी देशमुख
नितांत पेडणेकर
माधवी मराठे
जयदीप पाटील

**प्रकाशन व वितरण**
सुनीळ सामंत
ई-साहित्य प्रतिष्ठान

**मांडणी व सजावट**
वैभवी देशमुख
मंदार कुळकर्णी

**मार्गदर्शक मंडळ**
संहिता हिस्वनकर
आनंद माने
शशिकांत रणवरे

**छायाचित्रे**
कॅरोल डिकोस्टा, श्रीरंग कौलगी, गोरक्षनाथ देवकर(संबंधित)
इतर सर्व छायाचित्रे : साभार आंतरजाल व AI

**सूचना**

ह्या अंकातील लेखनाचे सर्व हक्क त्या त्या लेखकांचे आहेत. Copyright व त्यासंबंधी कायदेशीर प्रक्रियांची जबाबदारी संबंधित लेखकांची आहे. त्याला ई-विविधा तसेच ई-साहित्य प्रतिष्ठान जबाबदार असणार नाही. साहित्यात लेखकांनी व्यक्त केलेली मते पूर्णतः त्यांची असून त्यांच्याशी संपादक मंडळ सहमत असेल असे नाही. या अंकातील लेखनाचे आणि फोटोंचे सर्व हक्क त्या त्या लेखकाकडे सुरक्षित असून पूर्ण लेखनाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई(दंड व तुरूंगवास) होऊ शकते. हा अंक वेबसाइट वर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त इतर कुठल्याही कामासाठी वापरण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# संपादकीय

नमस्कार,

सर्वांना महाराष्ट्र राज्य दिन व मराठी राजभाषा दिनाच्या शुभेच्छा!

"एकदा सुरूवात केल्यावर सातत्य ठेवणे हे तितकेच कठीण आणि आवश्यक असते." ह्या तत्वाला अनुसरून ई-विविधा नियतकालिकाचा हा दुसरा अंक आपल्यापर्यंत आणताना आनंद होत आहे. पहिल्याच अंकापासूनच परिपूर्णतेचा अट्टाहास न करता हळूहळू प्रगती करावी हे आमचे मत आहे. मात्र त्यात दर्जाशी तडजोड होता कामा नये. वाचक आणि लेखकांच्या सूचना लक्षात घेऊन हा अंक बनवला आहे. आपल्याला तो कसा वाटला ह्याच्या प्रतिक्रिया आम्हाला नक्की कळवा.

मनुष्यप्राण्याला कल्पकतेचे देणे निसर्गदत्त असावे, पण जाणीवपूर्वक ती कल्पकता जोपासल्यानेच मनुष्य इथपर्यंत आला आहे. "जे जे उत्तम उदात्त उन्नत, महन्मधुर ते ते" असे वाचण्याचा, ऐकण्याचा, आत्मसात करण्याचा आणि लिहून, ऐकवून आणि रंगवून कलेद्वारे जगासमोर आणण्याचा प्रयत्न प्रत्येक माणसाने नक्की करावा. त्याने काय होईल? तर सगळीकडून सत्य, असत्य, अर्धसत्य तसेच कृत्रिम माहितीचा भडिमार होत असताना नेमके आवश्यक तेच आपण वेचायला आणि समजायला शिकू. अन्यथा भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता व कृत्रिम विदेच्या (मराठीत data) ओझ्याने जे शाश्वत, मानवी, नैसर्गिक आहे ते सगळेच दबून जाईल.

कृत्रिम बुद्धिमत्ता ही अनेक तंत्रज्ञानांपैकी एक आहे. ह्याआधी माणसाने विकसित केलेल्या विविध तंत्रांप्रमाणेच त्याचा योग्यायोग्य वापर कसा करावा हे माहीत असणे प्रत्येकासाठी आवश्यक आहे. शेवटी एखादे पुस्तक वाचताना कृत्रिम बुद्धिमत्तेने त्याचा सारांश काढून दिला तरी वाचनाचे, तो अर्क समजण्याचे, आणि त्याचा अर्थ लावण्याचे काम माणसालाच करायचे आहे. ते कोणीही हिरावून घेऊ शकणार नाही. त्यामुळे नवनवे तंत्रज्ञान उदयाला येत असताना आपली कल्पकता, इच्छाशक्ती तसेच जाणिवा जोपासून पुढे जायला प्रत्येकाने तयार व्हावे.

बदलत्या काळासाठी सज्ज व्हायला मराठी भाषेने, समाजाने आणि संस्कृतीने पाऊल टाकावे म्हणून आम्ही आणि तुम्ही मिळून प्रयत्न करू. त्यासाठी आपल्या सगळ्यांना शुभेच्छा!

आपला विश्वासू,
मंदार कुळकर्णी( कार्यकारी संपादक, ई-विविधा)
तसेच संपूर्ण संपादक मंडळ व ई-साहित्य प्रतिष्ठान

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| एक प्रयत्न मराठीसाठी | 01 | कॅरोल डिकोस्टा |
| माहेर | 0५ | शिल्पा गुप्ते जोशी |
| चहापोहे | 0६ | जयंत घाटे |
| पीएल की आयपीएल टीम | 0७ | उदय विरकुड |
| मोहरा | १0 | प्रितम गाडगीळ |
| एक छोटी तीर्थयात्रा | ११ | श्रीरंग कौलागी |
| शाळा चांदण्यांची(बालकविता) | १५ | संतोष पवार |
| आजोळच्या आठवणी | १६ | श्रद्धा हळदणकर |
| करार तिचा, कायदा माझा | १९ | अजिंक्य जाधव |
| कथा शिंग्रोबा धनगराची | २0 | पार्थ भगरे |
| माणुसकीचा सुगंध | २३ | भूषण कुळकर्णी |
| ऋण | २४ | गोरख देवकर |
| अजून माझी शाळा सुरू आहे | २८ | मंगेश चौधरी |
| कुणबी राजा | २८ | कोमल भोईर |

# एक प्रयत्न मराठीसाठी

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात, जिथे जग एका क्लिकवर उपलब्ध आहे, तिथे आपली मुळं कुठेतरी हरवत चालली आहेत की काय, असं सोहमला नेहमी वाटायचं. मुंबईच्या लोकलमध्ये प्रवास करताना असो किंवा ऑफिसच्या कॅन्टीनमध्ये, आजूबाजूची तरुण मुलं इंग्रजी शब्दांचा भडिमार करताना पाहिली की त्याच्या मनात एक हुरहूर दाटून यायची. "आपण सगळे सोशल मीडिया वापरतो... तासनतास रील्स पाहतो, पण आपल्या भाषेसाठी, आपल्या मातीसाठी आपण काय करतो?" हा प्रश्न सोहमला अस्वस्थ करत होता.

सोहमच्या या विचारांची बीजं त्याच्या लहानपणीच पेरली गेली होती. पालघरच्या एका कौलारू घरात पावसाच्या सरी झेलत बसलेलं त्याचं बालपण आजही त्याच्या डोळ्यांसमोर उभं होतं. त्याची आजी म्हणजे जणू मराठी म्हणी आणि वाक्प्रचारांचा चालता-बोलता कोश होती. सोहम तासनतास तिच्या गोष्टी ऐकायचा.

“अरे सोहम, ‘उंटावरून शेळ्या हाकणे’ म्हणजे काय माहिती आहे का तुला?” आजी वाटीत वरण वाढताना हसत विचारायची. सोहम आपला गृहपाठ सोडून तिच्याकडे पाहायचा आणि म्हणायचा, “नाही गं आजी, उंटावरून शेळ्या कशा काय हाकता येतील? उंट तर किती उंच असतो!” आजी मोठ्याने हसायची आणि सांगायची, “वेडा रे तू! उंटावरून शेळ्या हाकणं म्हणजे प्रत्यक्ष कामात भाग न घेता, दुरूनच नुसत्या सूचना देणं. आजकालची माणसं अशीच झालीत, स्वतः काही करत नाहीत पण दुसऱ्याला मात्र उपदेशाचे डोस पाजतात!”

आजीच्या या साध्या शब्दांतून सोहमला आयुष्याचं मोठं तत्वज्ञान कळायचं. आजी कधी कधी त्याला प्रेमानं टोमणेही मारायची. एकदा शाळेच्या स्पर्धेत सोहमची तयारी कमी पडली आणि तो स्टेजच्या चुकीबद्दल बोलू लागला, तेव्हा आजी म्हणाली होती, “अरे, ‘नाचता येईना अंगण वाकडे’ असं म्हणतात तुझ्यासारख्यांना! स्वतःची चूक कबूल करायला शिक आधी.”

त्या म्हणींमध्ये एक वेगळाच गोडवा होता. त्यातून जगण्याची रीत शिकायला मिळायची आणि विचार करणं भाग पडायचं. सोहम जसा मोठा झाला, तसा त्याला भाषेचा हा वारसा हरवल्यासारखा वाटू लागला. त्याने पाहिलं की, आपल्या पालघर-बोईसर भागातील 'आगरी' आणि 'सामवेदी' सारख्या बोलीभाषेतील शब्द आता हळूहळू लोप पावत आहेत. नवीन पिढीला हे शब्द माहितीच नाहीत. मग त्याच्या मनात एक विचार पक्का झाला,या सगळ्या बोलीभाषा, या म्हणी आणि हा गोडवा डिजिटल स्वरूपात जतन करता आला तर?

सोहम एका खाजगी कंपनीत नोकरीला होता, पण त्याचं मन साहित्यात रमायचं. मराठी शाळेत शिकल्यामुळे त्याला आपल्या भाषेचा सार्थ अभिमान होता. जेव्हा त्याने सोशल मीडियाचा वाढता प्रभाव पाहिला, तेव्हा त्याला एक भन्नाट कल्पना सुचली. आजची तरुण पिढी जर इंस्टाग्रामवर तासनतास घालवत असेल, तर त्यांना तिथेच आपली भाषा का सापडू नये?

त्याने उत्साहाने 'जतन बोलीचं' या नावाने एक पेज सुरू केलं. सुरुवातीला तो बोलीभाषेतील शब्द आणि त्यांचे अर्थ पोस्ट करू लागला. रोज रात्री थकून कामावरून आल्यावरही तो मोबाईल घेऊन बसायचा. "आज कोणता दुर्मीळ शब्द टाकू? 'खुळखुळा' टाकू की 'कोंदण'?" तो स्वतःशीच बोलायचा.

पण सोशल मीडियाचं गणित वेगळंच असतं. सुरवातीचे दोन महिने त्याला अत्यंत नगण्य प्रतिसाद मिळाला. त्याने खूप मेहनतीने बनवलेल्या पोस्ट्सना जेमतेम दहा-बारा लाईक्स असायचे. "काय उपयोग आहे ह्याचा? लोकांना कदाचित स्वतःच्या भाषेबद्दल काही पडलेलंच नाहीये," एक दिवस तो अत्यंत निराश होऊन लॅपटॉप बंद करत म्हणाला.

पण तरीही, त्याने हार मानली नाही. तो शांतपणे आपला संग्रह लोकांपर्यंत पोहोचवत राहिला. दरम्यान, सोहमच्या आयुष्यात एक मोठं संकट आलं. काही वैयक्तिक कारणांमुळे आणि ऑफिसमधील दबावामुळे त्याला नोकरी सोडावी लागली.

हाती पैसा कमी होता आणि भविष्याची चिंता वाढली होती. “आता काय करायचं?” हा प्रश्न त्याला सतावत होता. घरच्या अडचणींमुळे त्याला आपल्या आवडीच्या कामासाठी वेळ देणं कठीण झालं. तो खूप खचून गेला आणि त्याचं ‘जतन बोलीचं’ पेजही काही काळ शांत झालं.

एकेदिवशी मनातील मरगळ झटकण्यासाठी तो बाहेर पडला असताना त्याला त्याचा बालपणीचा मित्र राहुल भेटला. राहुल तंत्रज्ञानाची उत्तम जाण असलेला मुलगा होता. गप्पांच्या ओघात सोहमने त्याला आपल्या पेजबद्दल आणि सध्याच्या निराशेबद्दल सांगितलं.

“अरे सोहम! तू वेडा आहेस का? ही तर सोन्यासारखी कल्पना आहे!” राहुल उत्साहाने ओरडला.
“पण राहुल , कोणाला रस नाहीये यात! रिस्पॉन्स मिळत नाही रे,” सोहम उदासपणे म्हणाला.

राहुलने त्याचा खांदा थोपटला आणि म्हणाला, “मित्रा, तू फक्त माहिती देतोयस, पण लोकांना ती आवडेल अशा स्वरूपात मांडत नाहीयेस. आपण यात व्हिडिओ आणि ऑडिओचा वापर करूया. तू चालू ठेव, मी तुला एडिटिंग आणि डिझाइनमध्ये मदत करतो. आपण मिळून काहीतरी मोठं करूया!”

हे ऐकून सोहमच्या डोळ्यांत पुन्हा एकदा चमक आली. दोघांनी मिळून पुन्हा काम सुरू केलं. आता फक्त पोस्ट्स नव्हत्या, तर सोहम त्या शब्दांचा वापर करून छोटे छोटे संवाद रेकॉर्ड करू लागला.

पण काही दिवसातच राहुलला एका मोठ्या प्रोजेक्टसाठी राज्याबाहेर जावं लागलं. “सॉरी रे सोहम... आता जास्त वेळ देऊ शकणार नाही,” राहुल फोनवर म्हणाला. सोहम थोडा शांत झाला, पण खचला नाही. राहुलने दिलेल्या आत्मविश्वासाच्या बळावर त्याने स्वतःच एडिटिंग शिकून घेतलं.
सकाळी घरची कामं, दुपारी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास आणि रात्री उशिरापर्यंत आपल्या पेजसाठी काम, असा त्याचा दिनक्रम सुरू झाला. त्याने आपल्या भागातील जुन्या जाणत्या लोकांच्या मुलाखती घ्यायला सुरुवात केली. विस्मरणात गेलेले शब्द जेव्हा लोकांच्या समोर पुन्हा येऊ लागले, तेव्हा जादू व्हायला सुरुवात झाली.



त्याच्या एका पोस्टवर कमेंट आली, “खूप वर्षांनी हा शब्द ऐकला, आज माझ्या आजीची आठवण आली!” त्यानंतर दुसरी कमेंट आली, “हा शब्द आमच्या भागात असा वापरला जातो, खूप छान उपक्रम!” पाहता पाहता सोहमचं पेज एका मोठ्या चर्चेचं केंद्र बनलं. केवळ महाराष्ट्रातूनच नाही, तर सातासमुद्रापार असलेल्या मराठी माणसांपर्यंत त्याचं काम पोहोचलं. त्याचे फॉलोअर्स हजारोंच्या घरात गेले.

एक दिवस स्वतःच्या मोबाइलवर येणाऱ्या हजारो नोटिफिकेशनकडे पाहून तो हसत म्हणाला, “अरे, हे खरंच काम करतंय!” त्याने या यशाचं श्रेय राहुलला आणि आजीने दिलेल्या संस्कारांना दिलं. त्याने सिद्ध केलं होतं की, आधुनिक तंत्रज्ञान हे भाषेसाठी शाप नसून वरदान ठरू शकतं.

सोहमचा हा प्रवास आपल्याला शिकवतो की, आधुनिकता म्हणजे परंपरा सोडून देणं नव्हे, तर परंपरेला आधुनिकतेच्या साच्यात बसवून नव्या पिढीकडे सोपवणं होय. सोहमचा हा छोटासा प्रयत्न आता अनेकांसाठी प्रेरणा बनत होता. आजही तो नवीन शब्द पोस्ट करताना मनोमन म्हणतो, “आजी, तुझी भाषा आता कधीच नष्ट होणार नाही!”.

~ Carol(कॅरोल डिकोस्टा)
(@dcosta_carol_)
नालासोपारा(प.), मुंबई

# माहेर

तिच्या उशाशी तिने एक कप्प्याकप्प्यांची पिशवी ठेवलेली असायची
रात्रंदिवस ती तिचा जीवापलीकडे सांभाळ करायची
सकाळ झाली की उघडून त्यात काहीबाही शोधत राहायची
आणि रात्र झाली की दिवसभर तपासलेल्या त्यातल्या वस्तूंचा
पुन्हा नव्याने हिशोब ठेवायची
कुणी त्या पिशवीला हात लावलेला तिला चालत नसे
अन् त्याबद्दल काही विचारलेलंही तिला आवडत नसे
दिवसेंदिवस तिची पिशवी तिच्यासारखीच जीर्ण होत गेली
अन् हळुहळू त्या दोघींमधली घट्ट वीण उसवत गेली
एके दिवशी तिच्या देहागत तिची पिशवीही निश्चेष्ट झाली
तशी इतरांना दूर ठेवण्यासाठी तिने त्यांच्यात आखलेली रेघ अस्पष्ट झाली
ती गेल्यावर मग साऱ्यांनी तिची पिशवी उपसून पाहिली...
तर समोर तिच्या अवघ्या आयुष्याची तिने केलेली जपणूक उभी राहिली!
त्यात सापडली त्यांना तिने जपून ठेवलेली
तिच्या आजोबांची स्फटिकी जपमाळ
आणि देवांच्या आरतीसाठी कधीकाळी त्यांनी कुटलेले टाळ
तिच्या आजीच्या साडीचे उसवलेले काही धागे
अन् वडिलांच्या स्वाक्षरीचे राखून ठेवलेले काही कागद मागे
तिच्या आईने हाती लिहिलेल्या काही पदार्थांच्या पाककृती
तर आता दूर झालेल्या तिच्या भावंडांची जुनाट दुपटी
तिच्या माहेरच्या सागवानी खुर्चीचा तुटलेला हात
तर लहानपणी तिच्या सख्यांबरोबरच्या खेळातल्या गुंजा सात
एकएक करत जिवापाड जपलेलं तिच्या माहेरचं अंगण
साऱ्यांपासून दूर ठेवत राखलेलं, स्वतःभोवतीचं तिने आखलेलं रिंगण
त्यांना कळेना तिच्या ह्या रिंगणाचं आता करायचं काय?
तिच्याशिवाय, तिच्यानंतर, तिच्या रिंगणाला कोणी भेदू शकेल काय?

~ शिल्पा गुप्ते जोशी (Shilpa Gupte Joshi)
मुंबई, महाराष्ट्र (@shilpaagjo)
mysmg2003@gmail.com

# चहापोहे

वाकडी मान, तिरपी नजर
गालावरची नाजूक खळी
आज सारं कळतं आहे
का न कळलं त्यावेळी

माझे संथ, तोलूनमापून
प्रश्न एकामागून एक
तुझं मात्र नुसतं हसणं
हास्य तेच, लकबी अनेक

काय... कुठे... अं...नाही
उत्तरं की प्रश्न नवे?
माझं मन शोधत होतं
नक्की तुला काय हवे

आयुष्याचा अर्थ...
वाक्यं माझ्याकडून घरंगळली
एकाएकी गंभीर होऊन
माझी राणी का वेंधळली?

खूप बोलायचं होतं...
म्हणायचं होतं, ए तू दिसतेस गोड
पण जे ज्यावेळी म्हणायचं...
इत्यादी..इत्यादी.. जित्याची खोड

एक कर, पुन्हा कधी
मला कुठे नको दिसू
एकदा झालं ते झालं
आता जप, नको फसू....



~ JayantGhate(जयंत घाटे )
पुणे, महाराष्ट्र
(9423008398)

# पीएल की आयपीएल टीम

आयपीएलचा हंगाम सुरू झाला की चाहत्यांमध्ये उत्साह संचारतो आणि सगळे या स्पर्धेची आतुरतेने वाट पाहत असतात. आयपीएल मधील ‘पीएल” या अक्षरांनी मला एक गमतीशीर विचार सुचला आणि तोच या लेखातून मांडण्याचा प्रयत्न करत आहे.
पु. ल. (पीएल) हे महाराष्ट्रातील अतिशय लाडके साहित्यिक व्यक्तिमत्त्व! त्यांच्या विनोदी लेखनामुळे आजही त्यांचा चाहतावर्ग मोठा आहे.. सामान्य जीवन जगणाऱ्या साध्या माणसांचे त्यांनी इतक्या रम्य आणि विनोदी पद्धतीने व्यक्तिचित्रण केले की ती पात्रे अक्षरशः अजरामर झाली.

त्यांच्या लिखाणातील अनेक व्यक्तिरेखा आपण प्रेमाने आठवतो आणि त्यांच्या पुस्तकांकडे किंवा त्यांच्या कथनांकडे पुन्हा पुन्हा वळतो. आमची पिढी तर या व्यक्तिरेखांना अगदी आपल्या शेजारच्यांसारखी ओळखत मोठी झाली. त्यात रंगतदार रावसाहेब आहेत, कोकणातला मिश्किल अंतू बर्वा आहे आणि अशा इतर कितीतरी व्यक्तिरेखा आहेत ज्या त्यांनी आपल्या लेखणीतून जिवंत उभ्या केल्या.

मग मला वाटले, जर आयपीएलसाठी पुलंच्या व्यक्तिरेखांची एखादी टीम बनवायची झाली तर ती कशी असेल? म्हणजे ‘पीएल की आयपीएल टीम’.
आजकाल गावस्कर, अश्विन आणि इतर अनेक माजी क्रिकेटपटू कोणत्याही स्पर्धेपूर्वी त्यांच्या आवडीच्या सर्वोत्तम अकरांची निवड जाहीर करतात. मग आपणही पुलंच्या व्यक्तिरेखांमधून एक संघ का तयार करू नये? आणि तो संघ कसा असेल? अर्थात पुलंच्या साहित्याचा अधिक अभ्यास असलेले काही लोक, कदाचित वेगळी टीम निवडतीलही. असो. थोडी गंमत!

तर अशी आहे, मेरी पीएल की आयपीएल टीम.
या संघाचा कर्णधार म्हणून मला ‘तुझे आहे तुजपाशी’ या नाटकातील काकाजीं शिवाय दुसरे कोणी सुचत नाही. प्रभावी व्यक्तिमत्त्व, सर्वांकडून आदर मिळवणारे नेतृत्व आणि आक्रमक पण मनोरंजक, बुद्धिबळातिल डावपेच टी20 क्रिकेटसाठी अगदी योग्य! शिवाय ते यष्टीरक्षणही करू शकतील, त्यामुळे जवळून संपूर्ण खेळावर लक्ष ठेवता येईल. पतौडीसारखे ते राजबिंडेही आहेत.

पॉवर प्लेमध्ये आक्रमक सुरुवात करण्यासाठी नाथा कामत आणि रावसाहेब ही जोडी उत्तम ठरेल. नाथा कामत हा स्टायलिश आणि मनगटी (wristy) फलंदाज असेल, त्याचं व्यक्तिमत्व अगदी तरुणींवर चटकन छाप पाडणारं,, अगदी शुभमन किंवा ईशानसारखं आक्रमक! तर ‘रावसाहेब’ हे आजच्या काळातील उच्च स्ट्राईक-रेटचे धडाकेबाज ओपनर ठरतील. आपल्या फटकेबाजीने ते कोणत्याही गोलंदाजीवर तुटून पडू शकतात. अगदी संजू किंवा रोहित सारखे निःस्वार्थी, संघासाठी खेळणारे.

वरच्या फळीत तिसऱ्या क्रमांकावर नंदा प्रधान! भारावून टाकणारं व्यक्तिमत्व. कुठल्याही परिस्थितीत आत्मविश्वासाने स्थिरता देणारा फलंदाज म्हणून योग्य ठरेल. विशेषतः सलामीचे फलंदाज पॉवर-प्लेमध्ये लवकर बाद झाले तर तो खंबीरपणे विराटसारखा शेवटपर्यंत एकटाच लढेल.

मधल्या फळीमध्ये, क्रमांक चारवर चितळे मास्तर योग्य ठरतील. त्यांना उपकर्णधारही नेमू या. ते कडक स्वभावाचे पण विद्यार्थ्यांवर प्रेम करणारे शिक्षक आहेत. त्यामुळे संघाला सावरून धरण्यासाठी ते अगदी योग्य आहेत. संघातील खेळाडू पण त्यांना जसे विद्यार्थी आदर देतात, तसेच पाहतील. त्यांच्यानंतर काकाजी येतील. हे दोघे संघाचा अनुभवी कणा ठरतील. सहाव्या क्रमांकावर मी नारायणची निवड करेन. तो नेमका करतो काय, हे कुणालाच ठाऊक नसते. पण तो एक उत्तम ‘युटिलिटी प्लेयर’ ठरेल ,अगदी रिंकूसारखा. कोणत्याही परिस्थितीत पाठवला तरी तो काहीतरी करामत करून दाखवेलच आणि कुठल्याही जागी क्षेत्ररक्षणातही तो चपळ राहील.

दोन अष्टपैलू खेळाडूंमध्ये पहिले असतील पेस्तन काका वेगवान गोलंदाजी आणि आक्रमक फलंदाजी करणारे मजबूत आणि कणखर! अत्यंत उत्साही खेळाडू. दुसरा असेल अंतू बर्वा. तो परिस्थितीला अगदी आपल्या सोयीनुसार ‘फिरवू’ शकतो. मधल्या षटकांमध्ये धूर्त फिरकी टाकून धावा रोखणारा आणि खालच्या फळीत उपयोगी फलंदाजही ठरेल, म्हणजेच एकदम कंजूष गोलंदाज आणि स्ट्राईक रोटेट करणारा फलंदाज.

संघातील गूढ फिरकीपटू (मिस्टरी स्पिनर) असेल सखाराम गटणे. दिसायला साधा, किरकोळ, पण पद्धतशीर आणि थोड्या अनोख्या शैलीत गोलंदाजी करणारा. कधीही एखादा गुगली टाकून फलंदाजाला गारद करू शकणारा
.दहाव्या क्रमांकावर वेगवान गोलंदाज म्हणून हरि तात्या. कधी कधी थोडे अनियमित आणि महागडे ठरतील, पण त्यांच्यात प्रचंड धाडस आहे. दबावाखालीही ते कधी

घाबरत नाहीत. आणि शेवटी अकरावा, सर्व संघांना धडकी भरवणारा सर्वात भयानक वेगवान गोलंदाज नामू परिट ! त्याच्या व्यक्तिमत्त्वाइतकीच त्याची गोलंदाजीही तुफानी! बुमरासारखा, सामना जिंकून देण्याची ताकद असलेला खेळाडू.

पीएल की आयपीएल टीम काकाजी (कर्णधार व यष्टीरक्षक), नाथा कामत, रावसाहेब, नंदा प्रधान, चितळे मास्तर (उपकर्णधार), नारायण, पेस्टन काका, अंतू बर्वा, सखाराम गटणे, हरि तात्या, नामू परिट.
तिसरा अम्पायर आचार्य यांना नेमता येईल. तर कॉमेंट्री बॉक्स मध्ये बगुनाना, उस्मान शेठ, मधू मलुश्ठे व इतर प्रतिष्ठित मंडळी व त्यांच्या बरोबर पापण्यांची उगाच पिटपिट करणारी सुबक ठेंगणी!

तर कशी वाटली माझी पुलंची ची आयपीएल टीम? तुम्ही कुणाला निवडाल? जरूर कळवा.

~ उदय विरकुड
बॉस्टन, यु. एस. ए.



टिप्पणी: लेख वाचून काहींनी विचारलं की तू बबडूला का नाही संघात घेतलंस? तो तर उत्तम क्रिकेटपटू आहे. खरं आहे, पण तो सिलेक्शनसाठी उपलब्ध नव्हता. कारण मॅच फिक्सिंगच्या आरोपाखाली तो हल्ली तुरुंगात आहे.

# मोहरा

लावला आहे जरी मी मुखवटा तो हासरा
कोडग्याश्या आसवांचा वाहतो मग का झरा

जळमटे काढून सारी लख्ख केले घर जुने
का तरी अंधारतो मग, एक हळवा कोपरा

गोठले आवेश सारे, व्यर्थ धडपड थांबली
पाय असूनही का जराही सोडवेना उंबरा



प्रश्न नाही हा, नकोशी मी जगा की जग मला
का स्वतःच्या संगही मज, वाटतो शर बोचरा

चाल ही बुद्धी-बळाची, गाठले खिंडीमध्ये
प्राक्तनाचे भोग म्हणुनी, झुंजतो हा मोहरा

फुकट या माजात जगले, जाणते सर्वांस मी
वाटला जो ओळखीचा, श्वासही नाही खरा

भावनांची लक्तरे मी, टांगुनी वेशीवरी
सोहळा निर्मोहतेचा, आज केला साजरा

~ प्रितफुल प्रित (प्रितम गाडगीळ)
बोरिवली पूर्व, मुंबई
hiprit26@gmail.com

# एक छोटी तीर्थयात्रा

पुण्याच्या जवळ पानशेत, वरसगाव आणि टेमघर धरणे आहेत आणि ती रस्त्याने एकमेकांना जोडलेली आहेत. पुण्याहून पानशेतला जाणार रस्ता नदीच्या दुसऱ्या बाजूने पुण्याकडे रिंगरोड सारखा येतो. वरसगाव धरणाकडून तो रस्ता टेमघर धरणाकडे आणि खडकवासला धरणाकडे जातो.

त्या रस्त्यावर उंच डोंगरावर नीलकंठेश्वराचे पुरातन देऊळ आहे.ते एका वेगळ्या डोंगरावर आहे आणि तिथे वरसगाव आणि खडकवासला धरण ओलांडून एन. डी. ए.च्या बाजूने जाता येते. गेल्यावर्षी वरसगावच्या बाजूने गेलो होतो यावेळी एन. डी. ए.च्या बाजूने जावे असे ठरले.

तिथे जायचे म्हणजे गाडी अर्धाअधिक चढ जाते पण नंतर एका खडबडीत उभ्या वाटेने पायीच जावे लागते. मागच्यावेळी गाडी थोडी वर जाऊ शकली होती पण उशीर झाल्याने आणि रस्ता नक्की माहीत नसल्याने प्रयत्न सोडून द्यावा लागला होता. जिथे गाडी पोचली तिथून एक उभी चढण दिसली होती. पण तिच्या पायापर्यंत रस्ता पोचलेला दिसत नव्हता.या वेळी ऐनवेळी ठरवल्यामुळे निघायलाच एक वाजला होता. त्या दिवशी मागच्यासारखे ढगाळ वातावरण नव्हते. त्यामुळे कडक उन्हात आपण वर कसे चढणार हा प्रश्न होताच.पण ‘जाऊ या तरी’ असे म्हणून त्या एनडीएवरून जाणाऱ्या रस्त्याने निघालो. जेवण म्हणजे आज वनभोजन करावे असा बेत होता. तो मात्र यशस्वी झाला.

वनभोजन झाल्यावर पुढे निघालो. नीळकंठेश्वराच्या देवळाच्या पायथ्याशी एक रस्ता वर डोंगरावर जातो. तो चांगला उभा आहे आणि मध्ये मध्ये खडबडीत आहे. पण तो आता एका पार्किंग लॉट पर्यंत जातो. तिथे गा
डी उभी करता येते. तिथे एक छोटे एका स्वामींच्या प्रतिमेचे मंदिर आहे आणि

एक छोटे आवार आहे. वर जायचा उभा खडबडीत रस्ता तिथून सुरू होतो. थोड्या पायऱ्या आहेत मग खडबडीत रस्ता आहे. चढ चांगलाच आहे.
पार्किंग लॉटपासून देऊळ साधारण एक हजार फूट उंच असेल. शंकराची देवळे अशीच कठीण जागी असतात. भक्ताची परीक्षा घेऊनच शंकर दर्शन देतो. त्या परीक्षेशिवाय फळ मिळत नाही. जो भक्त या परीक्षेत पास होतो त्याला दर्शन मिळतेच. आणि हे देऊळ प्राचीन असूनही अतिशय मनोहारी आहे असे माहीत झाले आहे.
खालीच पार्किंग लॉट मध्ये चौकशी करून झाली होती की आम्हाला वर जायला जमेल की नाही म्हणून. पार्किंग वाला म्हणाला की थांबत थांबत जा, जमेल. पण आम्ही म्हटले "होईल तेवढे चढत जाऊ. थांबत थांबत जाऊ. फक्त नाही ते डेअरिंग करायचे नाही. वयाचा आणि शक्तीचा मान ठेवलाच पाहिजे. हो की नाही?"
चढायला तर सुरुवात केली पण छातीचा भाता आणि तो छातीतला पंप फार लवकर काही चढू देईना. आमच्या सारखे इतर तरूण लोक ही चढत होते. थोड्या फरकाने त्यांचीही अशीच अवस्था होत होती.



पुढे पाहिले तर न संपणारा चढ दिसत होता. ऊन डोक्यावर हे म्हणून तळपत होते. वरून येणाऱ्या लोकांना सारखे विचारत होतो, अजून चढ किती आहे म्हणून. पण नुसते विचारून रस्ता कसा संपणार? वरून येणारे लोक सांगत होते की चढ आहे आणि बराच आहे. ते तर दिसतच होते. मलातरी सारखे थांबायला लागत होते दम खायला. तसे आम्ही अर्धाअधिक चढ चढून गेलो, पण शेवटी आमच्या छातीतला पंप आणि भाता काय म्हणतो आहे याकडे लक्ष द्यावेच लागले.

तशी बरीच मंडळी वरून खाली आणि खालून वर जात होती. हे नीळकंठेश्वराचे देऊळ आणि परिसर फारच चांगला आहे असे वरून येणारे म्हणत होते.अजून थोडे वर जा मग रस्ता लेव्हल आहे आणि नंतर एकच चढण आहे देवळापर्यंत असेही सांगत होते. पण देऊळ पाच वाजता बंद होते असे ही सांगत होते. आता वाजले होते सव्वाचार! पाऊण तासात वर पर्यंत पोचणे मलातरी कठीण वाटत होते.पण शेवटी आमचे वय, आमचा दम आणि एकंदरीत दिसलेली परिस्थिती बघता “आता बास!” असेच म्हणावे लागले.



बाकी अर्धा रस्ता चढून गेल्यावर दृश्य फारच छान दिसत होते. सिंहगड वेगळ्या अँगलने दिसतो. खाली मुठेचे पाणी आणि अजून मागे असलेला खडकवासला धरणाचा पाणीसाठा दिसतो. सगळीकडे डोंगर आज थोडे शुष्क होते खरे पण पावसाळ्यात ग्रेट दिसत असेल दृश्य! मग नीळकंठेश्वराला तिथूनच नमस्कार केला. शौर्यापेक्षा शहाणपण चांगले असा विचार करून आणि पुन्हा नक्की येणार असे मनांत धरून उतरायला सुरुवात केली.

वर चढताना दम आणि छातीचा पंप यांनी अडवणूक केली होती. खाली उतरताना घसरणारे दगड, खडबडीतपणा आणि तोल सांभाळत, आणि दगडांवर पाय ठेवत ठेवत उतरायची प्रॅक्टिस आठवत यायचे होते. हां, पावसाळ्यांत काय होत असेल ते वेगळे. निसरडा चिखल, दगड आणि उभा उतार. कल्पना करून बघा. पण रस्ता करताहेत म्हणजे कधीतरी पूर्ण होईलच. चढ तर काय कुठे जाणार नाही पण रस्ता तरी खडबडीत नसेल.

खाली एक पाटी आहे. ट्रॅक्टरट्रॉलीने पाच लोकांना एक हजार रुपयांत नेऊन आणू म्हणून. वर जाताना दमल्यावर दगडावर बसून विश्रांती घेताना वरून एका ट्रॉलीला जुंपलेला एक बुलडोझर वरून खाली आला. ही जोडी इथे कशी चालते हेच आश्चर्य आहे. ती ट्रॉली म्हणजे रस्त्यावर नुसती बागडत होती. कोणी बसले त्या ट्रॉलीत तर आखडलेली हाडे नक्की सुट्टी करून मिळतील आणि त्या उभ्या चढावर चढताना आणि नंतर उभ्या उतारावरून खाली येताना तो कसा येत होता हे बघून हबकायलाच होत होते. त्या ड्रायव्हरचा जर कंट्रोल सुटला तर काय होईल याची कल्पना सुद्धा भीषण आहे.

अगदी कळसाला नमस्कार करून आले तरी ती तीर्थयात्राच समजतात की नाही? मग आम्ही तर दोन वेळा करून पाहिली. दोन्ही वेळेला नीळकंठेश्वराला लांबूनच नमस्कार. कळस जरी दिसला नाही तरी त्या डोंगराचे शिखर तरी दिसले ना! पण नीळकंठेश्वराला नक्कीच भक्तांची करूणा येत असेल आणि कधीतरी गाड्या सरळ वरपर्यंत पोचतील. आज त्याने आम्हाला भेटायला नाकारले तरी आम्ही पुन्हा प्रयत्न करू. त्यावेळी मात्र नीळकंठेश्वर प्रसन्न होऊन आपले दर्शन देईल हे नक्की!

~श्रीरंग कौलगी (9920612996)
दादर, मुंबई
shreerangkaulgi@gmail.com

# शाळा चांदण्यांची

चांदण्यांची शाळा भरली, चंद्र बनले 'सर'
आकाशाच्या फळ्यावर लिहू लागले सरसर

बिनभिंतीच्या शाळेला या नव्हतेच मुळी खांब
पसरली होती क्षितिजापर्यंत, होती लांबच लांब

एकेक चांदणी येऊ लागली हळूच डोकावून
हजेरी घेता घेता त्यांची, चंद्र सर गेले दमून



शुभ्र पांढऱ्या गणवेशाचा रूबाब होता न्यारा
चांदण्यांच्या सौंदर्याचा वेगळाच होता नजारा

काही चांदण्या लुकलुक करती, काही होत्या स्थिर
स्थिर चांदण्या करीत होत्या, अभ्यास होऊन गंभीर

मेघांनी मात्र अभ्यासाला केला नमस्कार दुरून
नकोच शाळा, वाऱ्यासंगे खेळती फेर धरून

अधून मधून एक दोनदा धुमकेतू लावी हजेरी
चंद्र सरांची शिक्षा ऐकून मग त्याला येई घेरी

शाळा सुटण्याचे वेळी आले, 'रवी' अधिकारी
पाहून त्यांना चंद्र सर मात्र, पळाले मागच्या दारी

~ संतोष पवार(@spawar043)
चराठे, सावंतवाडी, महाराष्ट्र (9960178044)
spawar043@gmail.com

# आजोळच्या आठवणी

उन्हाळी सत्राच्या परीक्षा संपल्या की वेध लागायचे ते आजोळी जाण्याचे! माझं गाव कोकणातलं आणि आजोळही कोकणातलंच. म्हणजे देवाकडून ‘छप्पर फाडके’ मिळतं म्हणतात ना ते असं. असो. तर आईची आवराआवर कधी होतेय आणि आम्ही कधी एकदा मामाच्या गावी जायला निघतोय असं व्हायचं. मग शिगेला पोहोचलेल्या उत्साह आणि उत्कंठेसह बस स्थानक गाठायचो. आता अवघ्या तीस किलोमीटरवर जाण्यासाठी धुरांच्या रेषा हवेत काढणारी झुकझुक आगीनगाडी काही नव्हती. तर आंब्या-काजूच्या बागांमधून जात, रस्त्याकडेच्या पळत्या झाडांशी शर्यत करत आमची ‘लालपरी’च आम्हाला मामाच्या गावी आणून सोडायची.

बसमधून खाली पाय टाकताक्षणीच पहिली भेटायची ती भणभणती हवा! कारण हे गाव तीनही बाजूंनी खाडीने वेढलेलं असल्याने ही हवा अशी काही मिठी मारायची की श्वास घेणं अवघड होऊन बसायचं. मग एका हाताने कसंबसं तोंड झाकून, हळूहळू श्वास घेत, डोळे मिटून त्या हवेचा उबदार, मायाळू स्पर्श अनुभवताना जो आनंद व्हायचा ना, तो शब्दात व्यक्त करणं अशक्य!

तिथून पुढची वाट पायी चालायची असायची. वरती कडक उन्हं आणि खालचा तापलेला रस्ता याची जाणीव गावाची वेस पाहताच हरपलेली असायची. वाटायचं या मोकळ्या कातळरानावरून वारा कानात शिरलेल्या वासरासारखं मनमुराद दौडत सुटावं. पण या वासराची बखोटी आधीच आईने घट्ट धरलेली असायची. तिथूनच आधी ग्रामदेवतेला नमस्कार करून मग आम्ही गावाच्या वेशीत पाय ठेवायचो. चरणाऱ्या गाई-गुरांतून वाट काढत, दुतर्फा झाडांच्या झुपकेदार सावलीचा आधार घेत शेताच्या बांधावर पोहोचायचो. त्यावेळी नांगरणीपूर्व शेतीची कामं चालू असल्याने अर्धीअधिक गावातली माणसं तिथेच भेटायची. त्यांची ख्यालीखुशाली विचारत व आपली त्यांना सांगत, गावाची घाटी गाठायची. त्यांच्यापैकी कोणीतरी हातातली बॅग घरी नेऊन पोहोचवायचे. त्यामुळे आम्ही अधिकच रमतगमत चालायचो.

या घाटीच्या दोन्ही बाजूला सुबक, लाल मातीची आणि मंगलोरी कौलारू छपरांची टुमदार घरं आहेत. त्यांची प्रशस्त सारवलेली अंगणं, त्यात रेखाटलेली चुन्याची रांगोळी, सुकत घातलेली वाळवणं, मध्यभागी उभी असलेली तुळशी वृंदावनं आणि त्या भर उन्हातही टवटवीत उभी असलेली तुळशीची रोपं, असं विलोभनीय दृश्य पाहता पाहता मामाचं घर कधी यायचं ते कळायचंच नाही. मामाच्या अंगणात पडलेला प्राजक्ताचा सडा तर अधिक वेड लावायचा.

बॅगेसोबत आमच्या येण्याची वार्ता आधीच पोहोचलेली असल्याने आजी दारात मीठ-मोहऱ्या घेऊन उभीच असायची. दृष्ट काढून झाल्यावर ती जेव्हा पोटाशी धरून अलायबलाय घ्यायची, तेव्हा तिच्या सुरकुतल्या हातांच्या स्नेहार्द्र स्पर्शापुढे जगातली सगळी सुखं फिकी वाटायची. मग पुढचा एक-दीड महिना आंबे, फणस, काजू, तोरणं, करवंद, जांभळं असा स्वादिष्ट रानमेवा चाखण्यात, मामेभावंडांवरोबर खेळण्यात, आजी व मावशीने बनवलेल्या अस्सल कोकणी पदार्थांचा आस्वाद घेण्यात, खाडीच्या किनाऱ्यावर फिरण्यात, रात्री अंगणात बसून चांदण्या मोजण्यात, आजी आजोबांच्या कुशीत पहुडण्यात कसा निघून जायचा, काही कळायचं नाही.

मग येऊन ठेपायचा तो परतीचा दिवस! एकीकडे माझ्या आवडीच्या पदार्थांची बांधाबांध करताकरता माझ्या हिरमुसलेल्या चेहऱ्याकडे पाहत आजी आईला आणखी एक दिवस राहण्याच्या आग्रह करायची. पण सुट्टीचा सगळा कोटा संपलेला असल्याने आम्हाला निघावंच लागायचं. शेवटी माझी काळजी घेण्याबद्दलच्या नाना सूचना आईला देत आजीआजोबा आम्हाला अंगणापर्यंत सोडायला यायचे. आधीपासूनच भरलेले त्यांचे डोळे निरोप देताना पूर्णपणे पाझरायचे.

गावातली काही मंडळीही आम्हाला निरोप देण्यासाठी यायची आणि जवळपास प्रत्येकाने काही ना काही भेटवस्तू आणलेली असायची. तो काळच असा होता की, आंब्याच्या मोसमात गावात येणारा प्रत्येक पाहुणा, अगदी पोस्टमनसह ड्रायव्हर-कंडक्टरही रिकाम्या हाताने कधीच परतायचे नाहीत. मग आम्ही तर त्यांच्या अगदी जिवाभावाची माणसं होतो. त्यामुळे बस थांब्यावर येईस्तोवर आमच्याकडची एक पिशवी आंब्यांनी काठोकाठ भरलेली असायची आणि त्याहीपेक्षा या प्रेमळ माणसांच्या सहवासाने ओतप्रोत भरलेलं मन घेऊन आम्ही बसमध्ये बसायचो. येताना ‘लाडकी लालपरी’ असलेली बस परतताना मात्र ‘दुष्ट राक्षसी’ वाटायची व तिच्या खिडकीतून दूर-दूर जाणारा मामाचा गाव पाहणं खूपच असहाय्य व्हायचं.

पुढच्या काळात वाढलेला अभ्यास आणि त्यानंतर नोकरीच्या पाठीमागची धावपळ यामुळे पूर्वीचा आजोळातला एक-दीड महिन्यांचा मुक्काम आता केवळ एक-दीड दिवसांवर आलाय. आजीआजोबाही नाहीत आणि नोकरीसाठी बरीचशी माणसंही गावाबाहेर गेलीत. त्यामुळे ओसाड पडलेली घरं आणि विराण शेतजमिनींकडे पाहताना मी त्यात गतवैभवाच्या खुणा शोधत राहते. १५-२० वर्षांपूर्वीचा तो थाट आता नसला तरी त्या सुवर्णकाळातील या आठवणींची शिदोरी मला आयुष्यभर पुरेल एवढं मात्र नक्की!

~ स्नेहसुता (श्रद्धा हळदणकर)
मुंबई, महाराष्ट्र



# करार तिचा, कायदा माझा

गुंतायचे नाही हा करार तिचा होता
करार मोडण्याचा कायदा माझा होता

वाऱ्याच्या वेगाचा मला अंदाज नाही
माझ्या शिडाचा भाता ताठ होता

वेळ किती मोजली तिने भेटीची
तिचा क्षणाचा, माझा शतकाचा डाव होता

सावरली बरेचदा ती स्वतःहून स्वतःच
तरी सहाऱ्यासाठी माझा हात होता

अन् वेळ ती तिने नकळत गाठली तेव्हा
तिचा हलका हात माझ्या हातावर होता

गुंतायचे नाही हा करार तिचा होता
करार मोडण्याचा आता तिचा हट्ट होता

आता एक घट्ट मिठी दोघांत होती
ती न सोडण्याचा नवा कायदा माझा होता





~ मीच तो (अजिंक्य जाधव )
वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग (7350579685)
@a.j.the_king_mich_to

# कथा शिंग्रोबा धनगराची

आपल्या देशाला औद्योगिकीरणामुळे खूप मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. मग ती व्यवसायाच्या दृष्टीने म्हणा किंवा संदेशवहनाच्या दृष्टीने! सर्वात जास्त विस्तार झाला असेल तर तो रस्ते आणि वाहतूक सेवेत! आपल्या देशाला ईस्ट इंडिया कंपनीने अर्थात इंग्रज सरकारने अजगरासारखा विळखा घातला होता. आपल्या देशाचा एकही असा भाग किंवा प्रांत नाही जिथे इंग्रजांनी आपली मुळे रोवली नव्हती. इंग्रज व्यापाराच्या दृष्टीने आले खरे, पण त्यांचा मनसुबा फक्त व्यापार करणे हा नव्हता तर इथे राज्य करून देशात औद्योगिक सत्ता आणणे हा होता! आपल्याला सगळ्यांना मुंबई-पुणे हा घाटमाथ्यावरील महामार्ग माहीत असेलच. ज्यातील घाटाला बोरघाट असे नाव आहे. त्या बोरघाटाविषयी एक गोष्ट मी सांगतो. हा बोरघाट आणि आपल्याकडे मुंबई ते पुणे हा रेल्वेमार्ग कसा निर्माण झाला त्याची ही गोष्ट! काही वर्षांपूर्वी ही गोष्ट मला माझ्या आईने सांगितली होती.

इंग्रजांना वाहतुकीसाठी लोहमार्ग बांधायचे होते. त्यांनी लोहमार्ग बांधण्यास सुरुवात केली आणि दिनांक १८ एप्रिल १८५३ रोजी भारतात पहिली रेल्वे ही बोरीबंदर(आजचे छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस) ते ठाणे अशी ३४ किलोमीटर अंतर धावली. पण इंग्रजांना फक्त मुंबई ते ठाणे इतकाच लोहमार्ग अपेक्षित नव्हता, तर त्यांना संपूर्ण देशात हे लोहमार्गाचे जाळे पसरवायचे होते. म्हणून त्यांनी मुंबई ते ठाणे नंतर मुंबई ते पुणे लोहमार्ग सुरू करायचे ठरवले. पण इंग्रजांना मुंबई ते पुणे लोहमार्ग बांधण्यासाठी अपेक्षित असा मार्ग (रस्ता) सापडत नव्हता. त्यांनी मुंबई ते पुणे हा लोहमार्ग १८५३ मध्येच करायचे निश्चित केले होते. कितीतरी मोठमोठ्या इंग्रज अधिकाऱ्यांनीसुद्धा ह्या प्रश्नापुढे आपले हात टेकले होते. त्यासाठी त्यांनी एका कमिटीची स्थापनादेखील केली होती. एक दिवस काही इंग्रज अधिकारी आणि इंग्रज शिपाई मुंबई ते पुणे रेल्वेमार्ग कसा सुरु कारायचा ह्यासाठी मार्ग शोधत शोधत एका घाटात आले. (तो घाट म्हणजे आजचा मुंबई-पुणे बोरघाट!) इतक्यात त्यांना समोरून एक पन्नाशी उलटलेला धनगर आपल्या मेंढ्यांना घेऊन समोरून येताना दिसला. शिंग्रोबा त्यांचं नाव! ह्या धनगराला बोरघाटाच्या दऱ्याखोऱ्यांची, निसर्गाची, कडे-कपाऱ्यांची आणि जमिनीच्या भुसभुशीतपणा-कठोरपणाची खडानखडा माहिती होती.

हा धनगर झाडाच्या आडोशाला बसून त्या इंग्रजांची रोज मजा बघत बसायचा. शेवटी ते इंग्रज हताश होऊन, वैतागून आपलं काम अर्धवटच सोडून जायच्या तयारीला लागले, तेव्हा शिंग्रोबांनी त्यांना विचारले, "म्या तुम्हास्नी या भागात रोज बगतुया, काय करायचा बेत हाय तुमचा ह्या डोंगरात?" त्यावर इंग्रज म्हणाले, "आम्ही सुरू केलेली मुंबई-ठाणे ही रेल्वे आम्हास पुण्यापर्यंत घेऊन जायची आहे. त्यासाठी आम्हाला लोखंडी रूळ बसवायचे आहेत. आम्ही इथे जागा शोधतोय, पण काही केल्या आम्हाला रस्ता सापडत नाही. त्यामुळे आता हे काम आम्ही इथेच अर्धवट टाकून परत जायच्या विचारात आहोत."

हे ऐकताच शिंग्रोबा म्हणाले, “हात तिच्या मारी! आवं येवढच नव्हं?... या म्या रस्ता दावतो तुमास्नी!... चला या माझ्या मागनं!” त्या धनगराच्या अशा वाक्यावर तो इंग्रज आणि त्याच्यासोबतचे इतर इंग्रज शिपाई भलतेच आनंदले अन् ते सगळे शिंग्रोबांच्या मागे मागे जाऊ लागले आणि शिंग्रोबांनी इंग्रजांना मुंबई-पुणे लोहमार्गाचा घाटमार्ग दाखवला. अशाप्रकारे मुंबई-पुणे हा लोहमार्ग सुरु झाला तो शिंग्रोबांच्या सहकार्यामुळे!

त्या इंग्रज अधिकाऱ्याला मार्ग सापडल्याचे इतके अप्रूप वाटले की त्याने त्या धनगराला विचारले, "आम्ही तुझ्यावर खूप खुश आणि मेहेरबान आहोत. आज तुला जे पाहिजे असेल ते माग, मी तुला ते देईन" त्यावेळी थोडा विचार करून ह्या धनगराने त्या इंग्रजाला उत्तर दिलं, "आरं मला देऊन देऊन काय देनार रं तू? मला कायबी नगं तुझ्याकडून! व्हय, एक गोष्ट शक्य आसल तर दे, माझ्या देशाला तुझ्या गुलामगिरीतून मुक्त कर अन आम्हासनी स्वातंत्र्य मिळवून दे!” धनगराच्या अशा मागणीवर तो इंग्रज भयंकर चवताळला. त्याने आपल्या कमरेला लावलेली पिस्तूल त्याच्या वर रोखली आणि त्याच्या कपाळी मध्यभागावर गोळी झाडली व त्या धनगराचा ह्या कपटी इंग्रज अधिकाऱ्याने जीव घेतला. त्यानंतर वैज्ञानिक तपासणीच्या आधारावर, तसेच शिंग्रोबा धनगराने दिलेल्या माहितीच्या आधारे डोंगर फोडून मुंबई ते पुणे असा लोहमार्ग बांधण्यात आला आणि त्यानंतर त्या लोहमार्गावरून धुराच्या रेषा हवेत सोडत, हॉर्नचा भोंगा वाजवीत डौलाने रेल्वेगाड्या धावू लागल्या. ज्या ठिकाणी ह्या इंग्रज अधिकाऱ्याने शिंग्रोबांची दगलबाजीने हत्या केली त्या ठिकाणी स्मारक म्हणून १९२९ साली मंदिर बांधण्यात आले अन् त्यापुढे धनगरांचा आधुनिक देवता म्हणून शिंग्रोबा धनगर प्रसिद्ध झाले. जेव्हा नवीन मुंबई-पुणे महामार्ग अस्तित्वात नव्हता तेव्हा

बोरघाट (तेव्हाचा खंडाळा घाट) चढताना काही वेळासाठी एसटी बसेस, रेल्वेगाड्या त्या ठिकाणी शिंग्रोबांना आदरांजली म्हणून थांबायच्या. आजही कित्येक लोक ह्या घाटातून प्रवास करताना काही वेळ थांबून शिंग्रोबांचे दर्शन घेऊनच पुढच्या प्रवासाला मार्गस्थ होतात.

तर ही होती शिंग्रोबा धनगरांची गोष्ट! बोरघाटाचे जनक म्हणून ओळखले जाणारे वीर हुतात्मा शिंग्रोबा मंदिर हे समस्त धनगर समाजाचे श्रद्धास्थान आहे. ह्या गोष्टीवर आधारित 'आरं आरं धनगरा!' हे गाणंसुद्धा प्रचलित आहे.

~ एक तरुण भारतीय लेखक(पार्थ भगरे)(@writer_parth )
गव्हाणपाडा, मुलुंड पूर्व, मुंबई (8850775154)
parth.bhagare2025@gmail.com



# माणुसकीचा सुगंध

सर्वत्र हसू फुलावे, आशेचे गीत गावे,
स्नेहाच्या संगतीत जीवन आनंदे बहरावे।।

नसावी वैरभावना, कुणाच्या अंतरी लवलेश,
प्रेमाची वीणा वाजे सदा, नांदो आपलेपणाचा ओघ अशेष।।

पुढे करूया सहकार्याचा हात, सुखदुःखाचे नाते बांधू,
माणुसकीच्या तेजाने एकरूप होऊन जग एकवटू।।

सत्य-दया-करुणेने जीवन नांदो सदा प्रसन्न,
प्रत्येक क्षणी अंगणात, शांतीचा सुगंध वाहो सनातन।।

संपत्ती, सिंहासने, हे सारे भ्रमाचे फक्त खेळ,
माणुसकीपुढे त्यांचे मोल ठरे क्षणिक मृगजळ।।

नको रत्नभांडार मला, नको वैभवाचा साज,
हास्य आणि प्रेमातच माझा खऱ्या सुखाचा राज।।

~ भूषण कुळकर्णी (एआयच्या मदतीने तयार केले आहे)
(9370571465)
bhushankulkar@gmail.com

# ऋण

आकाशात आभाळ दाटून आले होते...श्रीधरची कांदा पिशव्यांमध्ये भरायची लगबग चालली होती. तो आणि त्याची बायको शकुंतला बऱ्याच वेळापासून पिशव्या भरत होते. इकडून तिकडे मधेमधे कोमल आपली भिरभिर करत होती. शकुंतलाने तिच्याकडे कांदे निवडण्यासाठी घमेले दिले. त्यात मोठेमोठे, गोलगोल कांदे निवडून घालायचं काम कोमलकडे आले होते. श्रीधर कौशल्याने भरभर काम करत होता...

"आगं काल सुभ्याचा आणि राजाचा कांदा एक नंबरनी गेला म्हणत व्हता गाडीवाला."
" व्हय, आवं ताई म्हणत होत्या सुभानभावजींचा कांदा एक नंबर गेला."
"सोन्याने नुसती चिंगळीच पाठवली व्हती... तरी त्यालाबी खर्च जाऊन बरं पैसे राहिलं."

श्रीधरच्या चेहऱ्यावरती आनंद दिसत होता. यावर्षी कांद्याला जरा बरा भाव होता. गेल्यावर्षी खर्चसुद्धा निघाला नव्हता . गाडीवाल्याने संकोचून गाडीभाडेसुद्धा कमी घेतले होते. आडतदाराने बळंच एक-दोन रुपये दर वरती उचलला होता. यावर्षी कांद्याला जरा बरे दर होते, तर अवकाळी पावसाने थैमान माजवलं होतं. माल बाजारात जाईपर्यंत काय होईल याची खात्री देता येत नव्हती. बैल वेसणीला ताण देत होते. त्यांनासुद्धा घराची ओढ लागली होती.

कोमलने चांगल्या चांगल्या कांद्यांचे निवडून बरेच ढीग केले होते.
"आदी कोमलने केलेलं ढिग कणाकणा भर एका पिशवीत, मग इकडचं भर"

अंधार पडून बराच वेळ झाला होता. श्रीधरने बैलगाडी जुंपून कांद्याच्या थापीला लावली. एकेक पिशवी गाडीत भरू लागला. कोमल पिशव्यांवर वकल लिहीत होती. गाडी भरून झाल्यावर तिघेही गाडीत बसले. मार्केटला जाणाऱ्या टेम्पोकडे हा माल पोच करायचा होता. टेम्पो कधीचाच नाक्यावरती येऊन थांबला होता. तीन वेळा त्याचा फोन येऊन गेला होता. घर जवळ आल्यावर त्यानं शकुंतलाला आणि कोमलला तिथे सोडले.

"मी माल पोचता करून येतो, छान दाळ तडका कर." श्रीधर लाडिकपणे शकुंतलाकडे पाहत म्हणाला.

शकुंतला नुसताच 'बरं' म्हणाली आणि हसत घरी निघाली.

"पप्पांना बाय बाय कर", शकुंतला कोमलला म्हणाली. कोमलने पप्पांना बाय-बाय केला. घरी आजी आणि आजोबा कधीपासून वाट पाहत होते.

"किती यळ लावला गं? च्या कर बरं पटकिन आता, आमी कवाच्याधरन मनतुय आता येचान मग येचान."

शकुंतला हातपाय धुवून लगेच कामाला लागली. श्रीधरला माल पोहोचवून यायला चांगलाच उशीर झाला. आजी-आजोबा जेवून अंगणात झोपायला गेले होते. कोमलही त्यांच्यासोबत गप्पाटप्पा करत होती. जेवताना शकुंतलाने विषय काढला,

"या पाडव्याला कोमलला तरी नवीन कपडे आणा..."

"आगं यावर्षी आपल्याला देणंपाणी काय जास्त न्हाय... बघू किती पैसं व्हत्यात!"

पहाटे लवकर उठून श्रीधर टेम्पोवाल्याकडे गेला. तो वाटच बघत होता. मार्केटला नेहमीप्रमाणे गर्दी होती. टेम्पोवाल्याने वाट काढत नेहमीच्या आडतीवर गाडी घेतली. एकामागून एक लिलाव चालले होते. मालाची वजने होत होती. वजन लिहिणारे वजन वाढवून लिहिण्यासाठी शेतकऱ्यांकडून गुपचूप कमिशन घेत होते. श्रीधरला पहिल्यापासूनच असल्या गोष्टींची चीड होती. तो शांतपणे आपल्या मालाजवळ उभा राहून सर्व गोष्टींची गंमत पाहत होता. एक एक करत आडती श्रीधरच्या कांद्यापाशी आला.

"चला एक नंबर कांदा...एक नंबर कांदा...चला...चला ...लवकर घ्या थोडाच मालंय..१० रु...."

"मला ११नी करा" एक व्यापारी म्हणाला.

"मला १२ नी करा" दुसरा म्हणाला.

13...14...17...18....25....28...32...
32 एक...३२ दोन...३२ तीन.... फायनल 32... श्रीधरच्या कांद्याला 32 रुपये दर मिळाला. मार्केट मधला उच्चांकी दर होता. श्रीधर जाम खूश झाला होता. गेल्या सहा महिन्यातील कष्टाला फळ मिळालं होतं. आई-वडील, शकुंतला आणि कोमलला कपडे घेता येणार होते. पट्टी हातात पडताच तो घरी निघाला. घरी जाऊन कधी ही बातमी सांगतो असं त्याला झालं होतं.

तेवढ्यात त्याला कोपऱ्याला त्याच्या शेजारी राहणारे विजू काका चिंतेत दिसले.
"काहो विजूकाका, काय झालं?" श्रीधरने काळजीने विचारलं.
"आरं काय नाही रं, श्री...." त्यांना पुढे शब्द फुटेना. त्यांच्या डोळ्यात पाणी आलं होतं.
"काय झालं काका, मला नीट सांगा पाहू बरं."
"कालच्या वाऱ्यात आंब्याच्या कैऱ्या खाली पडल्या होत्या... म्हणून मार्केटला घेऊन आलो होतो, पण त्याला लिलावात कोण घेईना.. म्हणलं सणासुदीच थोडं पैसे व्हत्यान..कशाचं काय."

श्रीधरच मन क्षणात निराश झालं. पण अडचणीत निराश होईल तो श्रीधर कसला! त्याने मनाशी काहीतरी खूणगाठ बांधली व विजू काकांना म्हणाला...
"काय काळजी करू नका काका. मी आलोच..."
थोड्यावेळाने तो आला, त्याने हळद आणि मीठ आणले होते. दोन-तीन कैऱ्या कापून त्यावरती हळद मीठ टाकून "कैरी घ्या कैरीSSS ... एक नंबर कैरीSSS... हळद मीठ लावलेली कैरीSSS!" अशी आरोळी ठोकली.

एक एक गिऱ्हाईक जमा होऊ लागले. दुपारी बऱ्याच लोकांनी जेवताना कैऱ्या घेतल्या. बघताबघता तिसऱ्या प्रहरात विजूकाकांच्या कैऱ्या संपून गेल्या. श्रीधरला ओझं हलकं झाल्यासारखं वाटलं. दोघांनी मिळून गुढीपाडव्याची खरेदी केली. श्रीधरने आईवडिलांसाठी, शकुंतला, कोमलसाठी आणि स्वतःसाठी कपडे खरेदी केले.



विजुकाकांनी घरी नातवंडांना मिठाई घेताना, कोमललाही आवर्जून मिठाई घेतली. गावात आल्यावर विजूकाका श्रीधरकडे मिठाई देत म्हणाले," ही मिठाई खास माझ्याकडून कोमलसाठी." विजूकाकांना गहिवरून आलं.

"त्याची काय आवश्यकता हाय काका...
"आरं, तेवढंच मला ऋणातून मोकळं झाल्यासारखं वाटंल"
तेवढं बोलून विजूकाका घराकडे निघाले... श्रीधर त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत राहिला...

~ आप्पासाहेब (गोरक्षनाथ अच्युतराव देवकर)
जिंती, जि. सोलापूर (9146267799)
gorak.deokar@gmail.com

# अजून माझी शाळा सुरू आहे

मी शिक्षक नव्हे, विद्यार्थी आहे.
माझी शाळा आयुष्यभर सुरू आहे.

रोज मला धडे मिळतात,
जगायचे कसे ? वागायचे कसे ?
बोलायचे कसे ? राहायचे कसे ?
दिसायचे कसे ? चालायचे कसे ?

प्रत्येक परीक्षेत मी नापास होतो,
म्हणून, कायम त्याच वर्गात आहे.
अजून माझी शाळा मला,
अन् मी शाळेला सोडत नाही

~चारूदत्त (मंगेश चौधरी )
गोरेगाव पूर्व मुंबई, महाराष्ट्र
(7588727522)

# कुणबी राजा

घाम गाळून पिकवलेलं कवडीमोलानं विकलं,
भागवून भूक जगाची त्यानं मायेचं ऋण फेडलं.

राजकारण्यांनी मात्र त्याचं राजकारणच केलं,
स्वत:लाच दोष देत त्यानं घरदार सावरलं.

ध्यानीमनी नसताना पडद्याआड ठरला भाव,
काय करील कुणबी राजा कुंपणापर्यंत त्याची धाव.

जगाचा पोशिंदा आज स्वतःशीच हरला,
जगास पोसता-पोसता उपाशी पोटी झोपला.

रोजचं असं जिणं त्याला नकोसं झालं,
फासावर लटकणं म्हणूनच त्यानं पसंत केलं.

कुणब्याच्या मरणानं नाही कुणा पाझर फुटला,
जगाच्या बाजारात मात्र अन्नदाताच लुटला

~ काव्य soul (कोमल भोईर )
हैमु. खांडपे , पो. वडपे, ता. भिवंडी, जि. ठाणे

पहिला अंक तुम्ही इथे वाचू शकता!
खालील फोटोवर क्लिक करा आणि वाचा!



पुढील अंकात साहित्य पाठविण्यासाठी खालील लिंकवरच्या गुगल फॉर्ममध्ये आपली माहिती भरा आणि साहित्य जोडा. सर्व सूचना, नियम आणि अटी फॉर्म मध्ये दिलेल्या आहेत. अधिक माहितीकरिता आम्हाला संपर्क करा.

ई-विविधा साहित्य स्वीकृती अर्ज (गुगल फॉर्म)

*आपण लेखक किंवा कवी आहात का?*

*आपल्याला स्वतःचे लिखाण प्रकाशित करायचे आहे का?*

**आमचा संपर्क, एका क्लिकवर:**

https://www.esahity.com

@evividha.magazine

Evividha Esahity Magazine

evividha.magazine@gmail.com